


कराड नगरपरिषदेची भव्य इमारत. कराड नगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचे कामकाज याच वास्तुमध्ये चालते.

# प्रास्ताविक

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रगतीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या संस्थानी सामाजिक स्वतंत्र सत्ताचे विकेंद्रीकरण, नियोजन, विकासाच्या क्षेत्रात खूप मोठी प्रगती केली आहे.

नगरपालिका प्रशासन हा याचाच एक महत्वाचा भाग आणि पाया म्हणून ओळखला जातो, स्थानिक नेतृत्वाचे प्रशिक्षण केंद्र व लोकशाही विकास प्रक्रियेचे मुळ म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. विकासासंबंधीच्या महत्वाच्या गोष्टी स्थानिक नेत्यांना पुरविल्या जातात आणि त्यातूनच त्यांना स्वतःला निर्णय घ्यावयाचे असतात आणि म्हणून नगरपालिका प्रशासनाचा अभ्यास करण्याची प्रबळ इच्छा आणि या प्रबळ इच्छातूनच कराड नगरपालिकेची स्थापना आणि विकास कसा होत गेला या विषयीचा अभ्यास केला गेला.

कराड नगरपाकिलेची स्थापना १८५५ मध्ये झाली. सन १८५५ ते १९९३ या १३८ वर्षाच्या कालावधीतील नगरपालिका विकासाचा अभ्यास करणे ही महत्वाचे होते. हा अभ्यास प्रामुख्याने दोन गोष्टीवर म्हणजे ऐतिहासक पध्दती व एकंदरीत अस्तित्वात असणा-या तारखा, घटना, आकडेवारी ही खालील साधनावरुन घेतल्या आहेत.

१. मुळ साधने- कराड नगरपालिका रेकॉर्ड व विधानसभा डिबेट्स

२. दुय्यम साधने - प्रकाशित ग्रंथालयातील साधने

३. वर्तमानपत्रे, साप्ताहिके

४. अप्रकाशित एम.फिल. प्रबंध

५. मुलाखती

मुळ साधनामध्ये कराड नगरपालिकेने ठेवलेले रेकॉर्ड उदा. पत्रव्यवहार, जनरल प्रोसिडिंग बुक, नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड, नगरपालिका दवाखाना रेकॉर्ड, तपासणी अहवाल, पगार पत्रक, डयुटीलिस्ट फाईल वगैरे.

दुय्यम साधनामध्ये प्रामुख्याने वार्षिक प्रशासकीय अहवाल, नगरपालिका स्थायी समिती इतिवृतांत आणि उपयोग साहित्य त्याच बरोबर प्रकरणाला अनुसरुन असणारी पुस्तके तसेच वृत्तपत्रे, साप्ताहिके यांचा अभ्यास केला.

त्याच बरोबर काही नगरपालिका कर्मचारी यांच्या मुलाखती घेतल्या.

मुळ आणि दुय्यम साधनांचा अभ्यास करुन या मधील अंकाचे तक्ते व माहिती तयार केली आहे व त्याचा वापर यामध्ये केला आहे. तसेच नगरपालिकेने निरनिराळया खात्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे तयार केलेल्या माहितीचाही यामध्ये उपयोग केला आहे.

हा प्रबंध प्रामुख्याने सात प्रकरणात विभागला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना व कराड शहराचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा थोडक्यात आढावा घेणेत आला आहे.

दुस-या प्रकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे इंग्रजी आमदानीत कसे विकसित पावले. या विषयीची सुरुवातीला माहिती लिहिली आहे. त्यानंतर कराड नगरपालिका स्थापना, विकास व प्रशासन याचा आढावा घेतला आहे.

प्रकरण तिसरे मध्ये नगरपालिकेने पुरविलेल्या सार्वजनिक आरोग्य सुविधा व शहर सफाईशी संबंधित आहे.

प्रकरण चौथे मध्ये कराड नगरपालिकेच्या सांस्कृतिक वाटचालीचा आढावा घेतला आहे.

प्रकरण पाचवे सन १८५५ ते १९९३ या काळातील नगरपालिका उत्पन्न व खर्चाशी संबंधित आहे.

प्रकरण सहावे हे जागतिक विक्रमाचे व कर्मयोगी नगराध्यक्ष मा. पी. डी. पाटील यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

शेवटी उपसंहार व काही सूचना मांडल्या आहेत.

परिशिष्टये - मानपत्र - १ ते ४ जोडली आहेत.

प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भ दिलेले आहेत व शेवटी संदर्भ ग्रंथ सूची जोडली आहे.

# आभार

कराड नगरपालिकेचा इतिहास अभ्यासण्याची सुवर्णसंधी मला लाभलेली आहे. ही अमोल संधी उपलब्ध करुन देण्यात मला अनेकांनी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्य करुन, उत्तेजन दिलेले आहे. या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे परम कर्तव्य समजते.

कराड नगरपालिकेचा इतिहास लिहिण्याची प्रेरणा माझे गुरुवर्य व मार्गदर्शक डॉ. बी. डी. खणे यांनी दिली. डॉ. बी. डी. खणे यांनी या कामी अतिशय आस्थेने व सातत्याने मला मार्गदर्शन केले आहे. त्यांनी माझ्यासाठी घेतलेले परिश्रम, दिलेले प्रोत्साहन आणि त्यांचा लाभलेला कौटुंबिक जिव्हाळा हे सर्व विसरता न येण्यासारखे आहे. माझ्या या गुरुवर्यांची मी मनःपूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख, डॉ. अ. रा. भोसले व इतर स्टाफ, राज्यशास्त्र विभाग- प्रा. भारती पाटील यांच्याकडून मला प्रोत्साहन मिळाले आहे. याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बुद्रुक. ता. कराड, जि. सातारा- अध्यक्ष मा. जयवंतराव भोसले, उपाध्यक्ष मा. शिवाजीराव मोहिते, कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक प्राचार्य, डॉ. व्ही. बी. जमाले यांचे बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. त्या सर्वांची मी ऋणी आहे.

कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक मराठी विभाग, प्रा. सौ. वंदना पाटील यांच्या सदिच्छा माझ्या पाठीशी आहेत. त्यांची ही मी आभारी आहे.

संशोधन करुन शोध प्रबंध लिहिण्यासाठी मला संधी देणारे मा. पी. डी. पाटील, माजी नगराध्यक्ष यांचे ही अनमोल सहकार्य लाभल्याने मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री जाधव तसेच नगरसेवक, मानसिंग पाटील, सहयाद्री सहकारी साखर कारखान्याचे कर्मचारी श्री. सोनवणे, कराड नगरपालिका बांधकाम विभाग अभियंता, श्री. मुल्लासो।, अस्थापना विभाग, हेडक्लार्क श्री माळवदेसो। तसेच विठ्ठल पाटील व इतर कर्मचारी वर्ग या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

या शोध प्रबंधासाठी कराड नगरपालिका रेकॉर्ड उपलब्ध करुन देणारे स्टोअर प्रमुख, श्री प्रकाश आत्माराम कारंडे, रेकॉर्ड किपर काशिनाथ लक्ष्मण बर्गे, सुरेश जाधव, प्रकाश तोडकर, प्रकाश शिंदे - वॉचमन व कृष्णात भागवत, प्रमोद केळघणे-शिपाई तसेच गणपती जाधव मिटींग क्लार्क, कराड नगरपालिका वाचनालय कर्मचारी वर्ग इतर खात्याचे खातेप्रमुख व कर्मचारी या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

तसेच हा शोध प्रबंध श्री सिकंदर आय. शेख यांनी वेळेत टंकलिखित करुन दिला याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

शेवटी माझा हा शोध प्रबंध माझ्या आई-वडिलांच्या व बंधू भगवान पाटील यांचे आशीर्वाद व सहकार्याने पूर्ण करु शकले, हे मी कधीच विसरु शकत नाही.

स्थळ : कोल्हापूर

दि. :

**पाटील राजश्री शामराव**